**नि.दि.दा. क्र.४/२०१८**
**वंदना वि. बबन**
**नि.क्र.६४**

**पुढील सरतपास प्रतिवादी क्र.१ करीता साक्षीदार क्र.२ श्री ए. एम्. देवळे वकील साहेब शपथेवर सुरुः**

१. मी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. शपथपत्र नि–६४ वर दाखल आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास वादीतर्फे श्री डि.यु. ठाकरे वकील साहेबः**

**प्रश्नः हे म्हणणे बरोबर आहे काय की, सकवारबाईने हक्क सोडला असेल परंतु पटवारी यांनी नोंद घेतली नाही ?**

**उत्तरः होय.**

२. मी बारावी पास आहे. मला इंग्रेजी थोडेफार वाचता येते. पण मला अर्थ समजत नाही. मी दावा वाचलेला नाही. मला त्यातील मजकुर माहीत नाही. मी प्रतिवादी क्र.१ चा जबाब वाचलेला नाही व मला त्यातील मजकुर माहीत नाही. मला न्यायालयाचे साक्ष समंस आलेले नाही. मला प्रतिवादी क्र.१ न्यायालयात साक्ष आहे असे सांगितले. माझ्या प्रतिज्ञापत्रातील मजकुर मी जी माहीती दिली त्याप्रमाणे नमुद केली आहे. प्रतिज्ञापत्र न्यायालयात दाखल करणार आहे व शपथेवर साक्ष दयायची आहे याची मला कल्पना होती. प्रतिज्ञापत्रातील मजकुर मला असलेल्या माहीतीनुसार नमुद केली आहे.

३. सकवारबाईने हक्क सोडला आहे हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही परंतु तिने मला तोंडी सांगितले होते. तसेच तलाठी कोतवालास सांगितले होते. कोणत्या वर्षी सकवारबाईने तलाठी कोतवाला सांगितले हे मला माहीत नाही. सकवारबाईने लेखी स्वरुपात हक्क सोडला होता किंवा नाही याची मला माहीती नाही.

हे म्हणणे खरे नाही की, सकवारबाईने हक्क सोडला नसल्यामुळे कागदोपत्री पुरावा दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी न्यायालयाला खोटी माहीती देत आहे व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास – नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

(ओ–जे– कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर
पारशिवनी
दिनांकः१६/०३/२०२४

समक्ष

(ओ–जे– कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क–स्तर
पारशिवनी